## फास्ट न्यूज

### त्वष्टा कासार समाजातर्फे 'गडकरी मानवंदना'

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**



कसबा पेठेतील त्वष्टा कासार समाज संस्था वाचन मंदिरातर्फे ज्येष्ठ साहित्यिक राम गणेश गडकरी यांना ग्रंथदिंडीतून मानवंदना देण्यात आली. या दिंडीत टाळ-मृदंगाच्या गजरात पालखीतून नेण्यात आलेल्या निवडक ग्रंथसंपदेला आणि त्यांच्या पुतळ्याला साहित्यप्रेमींनी वंदन केले. या वेळी याज्ञवल्क्य आश्रमासमोरील पिंपळाच्या पाराजवळ इतिहासप्रेमी मंडळातर्फे 'गडकरी मानवंदना' हा कार्यक्रम सादर झाला. पतित पावन संघटना, भारत मित्र मंडळ, विजय तरुण मंडळ, विक्रांत मित्र मंडळ, जनार्दन पवळे संघ, तेजस मित्र मंडळ, प्रकाश मित्र मंडळ, प्रभात प्रतिष्ठान अशा विविध संघटनांनी त्यात सहभाग घेतला. या वेळी डॉ. न. म. जोशी, दादा पासलकर, मोहन शेटे, वाचन मंदिराचे अध्यक्ष अजित पिंपळे, सुनील तांबट, किशोर कर्डे आदी उपस्थित होते.

### चंडीपारायण सहस्त्रनाम

'शिवशक्ती' या संस्थेने चंडीपारायण ललिता सहस्त्रनाम होमाचे आयोजन केले होते. या यज्ञाचे पौरोहित्य प्रसिद्ध तमिळ याज्ञिक पंडित नट्टूशास्त्री व ब्रह्मवृंदाने केले. रास्ता पेठेतील महालक्ष्मी मंदिरात झालेल्या या यज्ञावेळी शिवशक्तीच्या अध्यक्षा मल्लिका अय्यर, शांती अय्यर, पुष्पा जाधव, मीना नायडू, शीला जाधव, मेघा कुलकर्णी, सुनीता गिरी, रेवती जाधव, ज्ञानम पिल्ले, बी. उमराणी आदी उपस्थित होत्या.

### विद्यार्थ्यांची स्वच्छता मोहीम

हजरत बिलाल उर्दू प्रायमरी स्कूल व नोबेल इंग्लिश प्रायमरी स्कुलच्या सुमारे ४५० विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत स्वच्छता मोहीम राबवली. जनजागृती फेरी काढत त्यांनी या मोहिमेत कचरा गोळा केला. या वेळी शाळेच्या संचालिका नौजिया पठाण, दिनेश धाडवे, रुपाली धाडवे, गौरव घुले, राहुल गवळी, भीमराव साठे, संदीप दळवी, मजीद गाजी आदी उपस्थित होते.



सदानंद गोडसे

**रस्त्यावरचा खोडा** कॅम्प परिसरातील नेपियर रोड भागात रस्त्यावरच भले मोठे पाइप टाकून ठेवले आहेत. त्यामुळे रहदारीला अडथळा होतोच; शिवाय अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही.

# 'योग्य धोरण, नियोजनाची गरज'

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'पुणे वेगाने विकसित होत असले, तरी पुण्यापुढे काही आव्हाने आहेत. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी योग्य धोरण आणि पुरेशा नियोजनाची गरज आहे. त्यासाठी सरकार, उद्योगजगत, शैक्षणिक क्षेत्र आणि नागरिक यांच्यामध्ये योग्य समन्वयाची गरज आहे,' असा सूर 'रॉकफेलर फाउंडेशन'तर्फे आयोजित '१०० रेझिलिएंट सिटीज' कार्यशाळेत मंगळवारी उमटला.

'रॉकफेलर फाउंडेशन'तर्फे गेल्या वर्षी जगभरातील '१०० रेझिलिएंट सिटीज'ची निवड करण्यात आली. यात पुण्यासह भारतातील एकूण पाच शहरांची 'रेझिलिएंट सिटी' म्हणून निवड झाली आहे. त्यासाठी व्यापक विचारमंथन करण्यासाठी ही कार्यशाळा आयोजिण्यात आली होती. पुणे महापालिकेचे आयुक्त कुणाल कुमार, '१०० रेझिलिएंट सिटीज'चे आशिया-पॅसिफिक क्षेत्रासाठीचे सिटी अँड प्रॅक्टिस मॅनेजमेंट विभागाचे सहसंचालक विक्रम सिंग या वेळी उपस्थित होते.



**'रेझिलिएंट' म्हणजे काय?**

'रेझिलिएंट' म्हणजेच लवचिक व्यूहरचनेचा विकास व अंमलबजावणी करण्यासाठी या शहरांना तांत्रिक सहकार्य व साधनसामुग्री; तसेच अन्य बाबतीत मोठ्या प्रमाणावर मदत केली जाणार आहे. या शहरांच्या नेटवर्कमध्ये पुण्याचा सहभाग झाल्याने या शहरांकडूनही विविध प्रकल्प आणि योजनांबाबत परस्पर सहकार्य आणि मार्गदर्शन मिळू शकणार आहे.

**पुणेकर स्वतःच्या शहराबाबत जागृत आहेत आणि शहराशी संबंधित प्रत्येक निर्णयाबाबत पुण्यात व्यापक चर्चा होते. त्यामुळे आव्हाने आणि धक्के व तणाव हाताळण्यासाठी कटिबद्ध असणारे पुणे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. पुण्याला रेझिलिएंट बनविण्यासाठी नागरिक आणि शैक्षणिक संस्थांमधील प्राध्यापक, विद्यार्थीही या उपक्रमात सहभागी होऊ शकतात.**

- विक्रम सिंग, '१०० रेझिलिएंट सिटीज'

'स्मार्ट सिटी म्हणून निवड झालेल्या पुण्यापुढे भविष्यात अनेक आव्हाने आहेत. या आव्हानांचा सामना करण्यासाठी सुरुवातीपासून योग्य नियोजन व अंमलबजावणीची गरज आहे. त्यासाठी रॉकफेलर फाउंडेशनच्या रेझिलिएंट सिटी उपक्रमातून मिळणारी मदत फायद्याची ठरेल,' असे कुणाल कुमार यांनी सांगितले.

**पुण्याला काय मिळणार**

'या कार्यशाळेत झालेल्या चर्चेवर आधारित एक कृती अहवाल तीन महिन्यांत तयार केला जाईल. त्याचबरोबर शहर प्रशासन, नागरिक आणि १०० रेझिलिएंट सिटी यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी चीफ रेझिलिएंट ऑफिसरची नेमणूक केली जाईल. जगविख्यात तज्ज्ञांची मदत आणि मार्गदर्शन मिळू शकणार आहे,' असे सिंग यांनी सांगितले.

# 'नेक्स्ट' परीक्षेला देशभरातून विरोध

## मेडिकल कॉलेजांमध्ये आज निषेध

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

मेडिकलच्या विद्यार्थ्यांना 'नीट' परीक्षेनंतर आता 'नेक्स्ट' परीक्षाही नव्याने देण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारने आणला आहे. परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच मेडिकल कौन्सिलकडे त्यांची नोंदणी होणार असून त्यानंतर वैद्यकीय व्यवसाय करता येणार आहे. यामुळे इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (आयएमए) राष्ट्रीय शाखेबरोबरच देशातील सर्व शाखा आणि मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी याला विरोध दर्शविला आहे.

बी. जे. मेडिकल कॉलेज, काशीबाई नवले मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थी या संदर्भात आज (बुधवारी ) निषेध नोंदविणार आहेत. 'नीट' ही स्पर्धात्मक गुणवत्ता परीक्षा आहे. ती उत्तीर्ण केल्याशिवाय मेडिकल कॉलेजला प्रवेश शक्य नाही; परंतु आता नीट देऊन वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी मेडिकल कौन्सिलकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी करण्यापूर्वी नॅशनल एक्झिट एक्झाम (नेक्स्ट) ही परीक्षा उत्तीर्ण करण्याचे बंधन घालण्यात आले आहे. परीक्षा नंतर झाल्यानंतरच विद्यार्थ्यांची नोंदणी होणार आहे. त्यामुळे वैद्यकीय व्यवसाय करता येऊ शकेल, असा प्रस्ताव केंद्राने तयार केला आहे. इंडियन मेडिकल कौन्सिल अॅक्टमध्ये सुधारणा केली जाणार आहे. प्रस्तावासंदर्भात केंद्राने 'आयएमए'चे मत मागवले आहे.

'नेक्स्ट' ही परीक्षा दिली नाही, तर अनेक विद्यार्थी एमबीबीएस होऊनही प्रॅक्टिसपासून वंचित राहणार आहेत. पर्यायाने देशाला डॉक्टरांची कमतरता भासण्याची भीती आहे. आयएमएच्या पुणे शाखेचे अध्यक्ष डॉ. मोहन जोशी, राज्य शाखेच्या संघटनेचे उपसचिव डॉ. संजय पाटील, नियोजित अध्यक्ष डॉ. प्रकाश मराठे आदींनी पत्रकार परिषदेत भूमिका मांडली.

**'आयएमए'च्या १७०० शाखांचा विरोध**

'केंद्र सरकारने नव्याने आणलेल्या 'नेक्स्ट' परीक्षेला देशातील 'आयएमए'च्या १७०० शाखांचा विरोध आहे; तसेच देशातील सर्व ४६२ मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी विरोध केला आहे. हा विरोध नोंदविण्यासाठी देशातील प्रत्येक मेडिकल कॉलेजमध्ये एक फेब्रुवारीला काळ्या फिती लावून विद्यार्थी या प्रस्तावाचा निषेध नोंदविणार आहेत. 'नीट' उत्तीर्ण झाल्याशिवाय मेडिकलला प्रवेश मिळणार नाही, असे असतानाही पुन्हा एकदा 'नेक्स्ट' परीक्षेचा घाट कशासाठी घाट घालण्यात आला, असा सवाल आयएमएच्या पुणे शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला.



### खडकीत विद्यार्थ्यांचे रक्तदान शिबिर



**पुणे :** तुकाराम जगन्नाथ महाविद्यालयाच्या विनाअनुदान शाखेने खडकी शिक्षण संस्थेचे माजी सचिव चंद्रकांत छाजेड यांच्या स्मृतीप्रित्यर्थ रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. महाविद्यालयात सलग २० व्या वर्षी जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने हे शिबिर घेण्यात आल्याचे प्रा. राजेंद्र लेले यांनी सांगितले. डॉ. नेने व डॉ. कांबळे यांच्या मार्गदर्शनानंतर ३५ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.


niesbud
उद्यमी लभते सिद्धिम्
२ दिवस व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम
**सौर उर्जा**
प्रत्यक्ष तांत्रिक प्रशिक्षण
सौर उर्जा व्यवसाय कसा करावा
राष्ट्रीय उद्योजकता आणि लघु व्यवसाय विकास संस्था (निसबड)
कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार
ए-२३, सेक्टर-६२, नोयडा उ.प्र. - २०१३०९, आयएसओ ९००१:२००८ प्रमाणित
**दिनांक** - ०४ आणि ०५ फेब्रुवारी, २०१७ (दोन दिवस)/ **वेळ** : स. १०.०० ते सं. ५.३०
**शुल्क** : रु. ६,५००/- अभ्यासक्रम शुल्क, प्रमाणपत्र, सॉफ्ट स्टडी मटेरियल, दुपारचे जेवण समाविष्ट.
**ठिकाण** : द ॲम्बॅसेडर हॉटेल, ११२५, मॉडेल कॉलनी, ऑफ एफ.सी. रोड, शिवाजी नगर, पुणे-४११०१६
अभ्यासक्रमातील घटक - सौर व्यवसायाचा प्रारंभ । केंद्र आणि राज्य धोरण । बिझनेस मॉडेल । आरओआय आणि पेबॅक । सौर प्रणालीचे आरेखन आणि बसवणे । तंत्रज्ञान आणि घटक । स्थान पृथःकरण । भारमापन । नोंदणी आणि सरकारी पाठबळ । नेट मीटरिंग पॉलिसी
सौर प्रणाली ऑफ ग्रिड/ ऑन ग्रिड/ थर्मल) व्यवसाय संधी (पॅनेल उत्पादन)
सौर उर्जा व्यवसाय करू इच्छिणारे कोणीही ह्या कार्यक्रमासाठी उपस्थित राहू शकतात.
प्रात्यक्षिक सत्र । सौर उर्जा घटकांचे प्रत्यक्ष इन्स्टॉलेशन
अधिक तपशिल आणि नोंदणीकरिता संपर्क साधा । मर्यादित जागा ४५
समन्वयक- ९९५३९२१४५९, ९९५३९२०४९८ । www.niesbud.nic.in
प्रमाणपत्र दिले जाईल.


# एक्स्प्रेस वेवरील टोल बंद करण्याची मागणी

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

पुणे-मुंबई एक्स्प्रेस वेवर टोल आकारणीचे उद्दीष्ट नोव्हेंबर महिन्यात पूर्ण झालेले आहे. मात्र, त्यानंतरही टोल वसुली सुरूच आहे. त्यामुळे राज्य सरकारने येत्या १५ दिवसांत टोल वसुली बंद करावी अन्यथा मुख्यमंत्री, राज्य रस्ते विकास महामंडळाचे (एमएसआरडीसी) मंत्री व व्यवस्थापकीय संचालक यांच्याविरोधात गुन्हा तक्रार दाखल करण्याचा इशारा सजग नागरी मंचाने दिला.

एक्स्प्रेस वेवर ऑगस्ट २०१९ पर्यंत दोन हजार ८६९ कोटी रुपये टोलद्वारे वसूल करण्याचे उद्दीष्ट होते. ऑक्टोबर २०१६ अखेर २८६७ कोटी रुपये वसूल झाले होते. नोव्हेंबर महिन्यात नोटाबंदीच्या निर्णयानंतर टोल आकारणी बंद ठेवल्यामुळे संपूर्ण महिन्यात केवळ १३ कोटी जमा झाले. त्याचवेळी टोल वसुलीचे उद्दीष्ट पूर्ण झाले. मात्र, त्यानंतरही टोल वसुली सुरूच ठेवल्याने डिसेंबर महिन्यात ४३ कोटी रुपये अतिरिक्त जमा झाले असून जानेवारीत अद्यापही टोल वसुली सुरूच आहे. याबाबत मुख्यमंत्री, 'एमएसआरडीसी'चे मंत्री एकनाथ शिंदे व व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार यांना टोल आकारणी बंद करण्याचे निवेदन दिले आहे. अजून त्यावर कार्यवाही करण्यात आलेली नाही. मुख्यमंत्र्यांना आम्ही १५ दिवसांची मुदत देत आहोत. या १५ दिवसांत टोल आकारणी बंद न केल्यास तिघांच्या विरोधातही अँटी करप्शन विभागाकडे तक्रार करणार आहोत, अशी माहिती मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

'एक्स्प्रेस वेवर टोल'पूर्ती' झाल्यापासून आम्ही टोल'मुक्ती'साठी प्रयत्न करीत आहोत. सर्व संबंधितांना याबाबत सातत्याने पत्रव्यवहार केला आहे; तसेच कायदेशीर नोटीसही पाठविली आहे. आता राज्य सरकारने निर्णय न घेतल्यास आम्ही कोर्टात धाव घेऊ,' असा इशाराही त्यांनी दिला. संजय शिरोडकर, प्रवीण वाटेगावकर आणि श्रीनिवास घाणेकर या वेळी उपस्थित होते.

**भारतीय जनता पक्षाने टोलमुक्तीचे आश्वासन देऊन राज्यात सत्ता मिळविली आहे. आता महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने नवनवीन आश्वासने दिली जात आहेत. मात्र, त्यांना जुन्या आश्वासनांचा विसर पडत आहे. त्यांनी टोलमुक्तीचे आश्वासन आधी पूर्ण करावे, मग नंतर आश्वासने द्यावीत.**

- विवेक वेलणकर, अध्यक्ष, सजग नागरी मंच

# 'एनएफएआय'ला 'चेतना'

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या (एनएफएआय) संग्रहात चित्रपट व चित्रपटांशी दुर्मिळ साहित्याचा समावेश झाला आहे. २५ बंगाली व हिंदी दुर्मिळ चित्रपट, गाण्यांची पुस्तके, छायाचित्रे, पोस्टर्स व 'चेतना' या चित्रपटाची मूळ लिखित प्रत संग्रहालयाला उपलब्ध झाली आहे. शर्बोन संध्या हा बंगाली (१९७३), सुचित्रा सेन यांचा पहिला चित्रपट असलेला चंद्रनाथ (१९५७), राजबोधू (१९८२) हे दुर्मिळ चित्रपट ३५ एमएम या प्रकारात मिळाले आहेत.


'संग्रहालयाला गेल्या आठवड्यात अंजन बर्वे व नरेश बोडे या संग्रहकांनी एक हजार गाण्यांची पुस्तके, चित्रपट विषयक पुस्तके, छायाचित्र व पोस्टर्स जतन करण्यासाठी दिली आहेत. कोलकाता येथील एका व्यक्तीने १६ एमएम या दृश्य प्रकारातील २५ चित्रपटांच्या प्रती संग्रहालयाकडे सुपूर्द केल्या आहेत,' असे संग्रहालयाचे संचालक प्रकाश मगदूम यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

१९७० मधील 'चेतना' या चित्रपटाची मूळ प्रत दीप्ती नवल यांनी दिली आहे; तसेच त्यांनी दिग्दर्शित केलेला २००८ मधील 'दो पैसे की धूप, चार आणे की बारीश' हा चित्रपट मिळणार आहे. प्रदर्शित न झालेला हा चित्रपट नवल यांच्या उपस्थितीत लवकरच दाखवला जाऊ शकतो.

**संग्रहालयाकडे मूळ लिखित प्रत उपलब्ध**

**चित्रपट महोत्सव**

स्थापना दिनानिमित्त चार व पाच फेब्रुवारी रोजी चित्रपट महोत्सव होणार आहे. यामध्ये संस्थेने रिस्टोअर केलेल्या अभिजात चित्रपटांचा आस्वाद डिजिटल सिनेमा प्रोजेक्टरवर (डीसीपी) घेता येणार आहे. शनिवारी सकाळी अकरा वाजता ऋत्विक घटक यांचा 'मेघे ढाका तारा,' दुपारी तीन वाजता के. बालचंदर यांचा 'तन्नीर तन्नीर,' सायंकाळी सहा वाजता बिमल रॉय यांचा 'दो बिघा जमीन' तसेच रविवारी सकाळी अकरा वाजता 'सबकुछ पुलं' असलेला 'गुळाचा गणपती', दुपारी तीन वाजता अदूर गोपालकृष्णन यांचा 'मथिलुकल' व सायंकाळी सहा वाजता गुरू दत्त यांचा 'कागज के फूल' हे चित्रपट पाहता येतील. महोत्सव सर्वांसाठी खुला आहे.




**राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचा बुधवारी (एक फेब्रुवारी) ५३ वा स्थापना दिवस आहे. त्यानिमित्त कर्मचाऱ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम व स्नेहमेळावा सायंकाळी पाच वाजता आयोजित करण्यात आला आहे. रसिकांनी या स्नेहमेळाव्यात सहभागी व्हावे, चार फेब्रुवारी रोजी दुपारी चार वाजता हेरिटेज वॉक होणार आहे. प्रभात रस्ता व कोथरूड या दोन्ही ठिकाणची संस्था पाहण्यासाठी खुली असेल. कोथरूड येथे जाण्यासाठी वाहनाची सोय आहे.**

- प्रकाश मगदूम, संचालक, एनएफएआय


**BAJAJ FINANCE LIMITED**

**Registered Office:** Akurdi, Pune - 411 035
**Corporate Office:** 4th Floor, Bajaj Finserv Corporate Office, Off Pune - Ahmednagar Road, Viman Nagar, Pune - 411 014

**Fixed Deposit Schemes**
**'FAAA/Stable' Rating by CRISIL | 'MAAA (Stable)' Rating by ICRA**

'FAAA/Stable' Rating by CRISIL and 'MAAA (Stable)' Rating by ICRA indicate the highest degree of safety with regard to timely payment of interest and principal on the instrument.

**Retail rate of interest per annum valid up to ₹ 5 crore (w.e.f. 6 February 2017)**

| Tenure in months | Cumulative | Non-Cumulative | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Monthly | Quarterly | Half Yearly | Annual |
| 12 – 23 | 7.80% | 7.53% | 7.58% | 7.65% | 7.80% |
| 24 – 35 | 8.00% | 7.72% | 7.77% | 7.85% | 8.00% |
| 36 – 60 | 8.05% | 7.77% | 7.82% | 7.89% | 8.05% |

a) Senior Citizens (more than 60 years of age, subject to provision of proof of age) - Additional rate of 0.25% p.a. for deposit size up to ₹ 1 crore
b) Bajaj Group Employees - Additional rate of 0.10% p.a. (BHIL, BAL, BFS, BFL, MSL, BAGIC, BALIC, MUKAND and BAJAJ ELECTRICALS) for deposit size up to ₹ 1 crore
c) Bajaj Finance Limited existing loan customers and FD renewal customers - Additional rate of 0.10% p.a. for deposit size up to ₹ 1 crore
d) Only one of the above special category benefit is allowed per transaction
e) Rate of interest for bulk deposits of more than ₹ 5 crore may vary from the published card rate and to be decided on a case to case basis by Bajaj Finance Limited

All other terms and conditions of the Fixed Deposit scheme of the company as approved by the Board of Directors at its meeting held on 26 July 2016 remain the same.

For **Bajaj Finance Limited**

Date: 25 January 2017
Place: Pune

**Rajeev Jain**
**Managing Director**

**HOW TO INVEST:**
The amount should be deposited only by cheque made payable to "BAJAJ FINANCE LTD – ACCOUNT NUMBER 00070350006738" and crossed "Account Payee only". The cheques should be payable at par and CTS compliant. Application Form along with the necessary remittance should be sent to the distributors of the Fixed Deposit Schemes of BFL or be submitted at any of the BFL branches. **Write to us at fd@bajajfinserv.in or call us on 020 30405646.**


# गुंडांच्या पक्षाला पाठिंबा नाही

**म. टा. वृत्तसेवा, दौंड**

'देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आहेत, की विरोधी पक्षनेते आहेत हेच कळत नाही. फक्त हात हलवून बेंबीच्या देठापासून बोलतात. त्यांच्या पक्षाची गुंडांचा पक्ष म्हणून प्रतिमा निर्माण झाली आहे. शिवसेनेने या गुंडांच्या पक्षाचा पाठिंबा काढून घेतल्यास हे सरकार पडेल. त्यावेळी आमचा पक्ष भाजपला पाठिंबा देणार नाही,' असे प्रतिपादन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी केले.

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या प्रचाराचा प्रारंभ दौंड तालुक्यातील चौफुला येथील बोरमलनाथ मंदिरात झाला. त्यानंतर झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. या वेळी माजी आमदार रमेश थोरात, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जालिंदर कामठे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रदीप कंद उपस्थित होते.

पवार म्हणाले, 'मोदी सरकारच्या काळात पाकिस्तानच्या कुरघोड्या वाढल्या आहेत. सीमेवर असणारे आपले जवान मोठ्या संख्येने हुतात्मा झाले आहेत. मोदी सरकार पाकिस्तानला जशास तसे उत्तर न देता बघ्याची भूमिका घेत आहे,' असेही पवार म्हणाले.

'मोदी सरकारने नोटाबंदीचा निर्णय घेऊन ८० दिवस होऊन गेले तरी परिस्थिती न बदलता अर्थव्यवस्था कोलमडलेलीच आहे. पाटस येथील भीमा सहकारी साखर कारखाना हा आर्थिक अडचणीच्या कारणामुळे या वर्षी सुरू होऊ शकला नाही. या कारखान्यावर कोट्यवधीचे कर्ज आहे. राज्य सरकारने हमी दिल्यास या भीमा सहकारी साखर कारखान्यास पुणे जिल्हा बँक मदत करण्यास तयार आहे,' असेही ते म्हणाले.

**माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन**




जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचाराचा प्रारंभ चौफुला येथील बोरमलनाथ मंदिरात झाला. त्यानंतर झालेल्या जाहीर सभेत बोलताना अजित पवार.


एसटीव्ही @₹ 99/- अमर्यादित मोफत कॉल्स (लोकल/एसटीडी) बीएसएनएल नेटवर्कवर (मोबाईल+लँडलाईन) + 300MB मोफत डाटा वैधता २८ दिवसांसाठी
एसटीव्ही @₹ 339/- अमर्यादित मोफत कॉल्स (लोकल/एसटीडी) सर्व नेटवर्कवर (मोबाईल+लँडलाईन)+ 1GB मोफत डाटा वैधता २८ दिवसांसाठी
डाटा एसटीव्ही @₹1099/- अमर्यादित डाटा स्पीडचे बंधन नाही. वैधता ३० दिवसांसाठी
अमर्यादित कॉल व डेटा ऑफर्स
BSNL Connecting India Faster

**गणतंत्र दिवस विशेष ऑफर्स**
३१/०३/२०१७ पर्यंत

| एसटीव्ही एमआरपी | फ्रीबीज |
|---|---|
| ₹ 26 | होम एलएसए नेटवर्क मध्ये अमर्यादित मोफत कॉल्स (लोकल/ एसटीडी) सर्व नेटवर्कवर . वैधता-२६ तास |
| **कॉम्बो व्हाऊचर** | **फ्रीबीज** |
| ₹ 2601 | २६०० रूपये मुख्य खात्यात (मेन अकाऊंट मध्ये)+९० दिवसांच्या वैधतेसह १३०० रूपये समर्पित खात्यात (डेडीकेटेड अकाऊंटमध्ये) |
| ₹ 6801 | ६८०० रूपये मुख्य खात्यात (मेन अकाऊंट मध्ये)+९० दिवसांच्या वैधतेसह ६८०१ रूपये समर्पित खात्यात (डेडीकेटेड अकाऊंट मध्ये) |

**बीएसएनएल डबल डेटा ऑफर्स**
रिजार्च करा ३१/०३/२०१७ पर्यंत

| डेटा एसटीव्ही @ | एकुण मोफत वापर |
|---|---|
| ₹ 4,498/- | 40 GB+40 GB |
| ₹ 3,998/- | 30 GB+30 GB |
| ₹ 2,798/- | 18 GB+18 GB |
| ₹ 1,498/- | 9 GB+9 GB |

वैधता 365 दिवस

**नवीन ग्राहकांसाठी (एमएनपी सहित) ऑल फ्री प्लान व्हाऊचर**
(प्रमोशन ऑफर २९/०४/२०१७ पर्यंत उपलब्ध)

| प्लान व्हाऊचर | फ्रीबीज | प्लान वैधता |
|---|---|---|
| ₹ 144 | अमर्यादित कॉल्स बीएसएनएल (लोकल/एसटीडी) आणि इतर नेटवर्क# (लोकल/एसटीडी). प्रथम ३० दिवसांकरिता मोफत. | 180 दिवस |
| ₹ 439 | अमर्यादित कॉल्स बीएसएनएल (लोकल/एसटीडी)आणि इतर नेटवर्क# (लोकल / एसटीडी). प्रथम ९० दिवसांकरिता मोफत. | 180 दिवस |

#मोफत व्हॉईस कॉल इतर नेटवर्क (लोकल /एसटीडी) करीता ३० मिनिटे/दिवस मर्यादित आहे.



*अटी व शर्ती लागू

अधिक माहितीसाठी टोल फ्री नंबर १५०३ /१८०० १८० १५०३ किंवा ग्राहक सेवा केंद्र/फ्रेंचाईसी/रिटेलर वर संपर्क करा
आमचं पेज लाईक करा - /bsnlcorporate, अनुकरण करा /bsnlcorporate, वेबसाईट : www.maharashtra.bsnl.co.in
नोंदणी आणि कॉर्पोरेट कार्यालय : भारत संचार भवन, हरिशचंद्र माथुर लेन, जनपथ, नवी दिल्ली. (CIN): U74899DL2000GOI107739. वेबसाईट : www.bsnl.co.in
भारत संचार निगम लिमिटेड
महाराष्ट्र दूरसंचार परिमंडळ
BSNL MOBILE
Sunjeet Comm.